MHLA160000772009

**नियमित दिवाणी दावा क्र.५९/२००९**
**शकुंतलाबाई वि. वेंकट व ईतर**

–:: **नि.क्र.१ लगत आदेश** ::–

मी प्रकरणाचे काळजीपूर्वक अवलोकन केले. वादी आणि त्यांचे अधिवक्ता गैरहजर आहेत. सन्माननीय उच्च न्यायालयाने सदर प्रकरण पुर्नसंपरिक्षेकरिता पाठविले आणि पाच महिन्याच्या आत निकाली काढण्याचे निर्देश दिलेले आहेत. आजरोजी प्रकरण पुराव्याकरिता नेमलेले आहे. वादीने पुरावा नोंदविलेला नाही. यापूर्वी प्रकरणामध्ये प्रतिवादींच्या गैरहजेरीमध्ये झालेला पुरावा प्रतिवादींना उलटतपास घेण्याची पुरेशी संधी न देता तो त्यांच्या विरुध्द वापरता येणार नाही व त्याआधारे दावा गुणवत्तेवर निकाली काढता येणार नाही. सबब वादीने त्याची नोंद घ्यावी आणि सर्व साक्षीदारांची साक्ष पूर्ण करण्याकरिता त्यांना पुढील तारखेवर न चुकता हजर करावे. अन्यथा त्यांच्या कसुरानिशी दावा खारीज करणे उचित ठरेल. संबंधितांनी नोंद घ्यावी.

०२. आदेश संगणकावर टंकलिखित केला आणि खुल्या न्यायालयात घोषित केला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2025.10.29 17:47:50 +0530

**ठिकाण – देवणी**
**दिनांक – २९–१०–२०२५**

**( श.अ. सुरजुसे )**
**दिवाणी न्यायाधीश क. स्तर,**
**देवणी.**